# कंत्राटी पदांची पदभरती जाहीरात 2023-24

जिल्हा एकात्मीक आरोग्य व कुटुंब कलयाण सोसायटी,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद उस्मानाबाद
अंतर्गत कंत्राटी रिक्त पदे पदभरती 2023-24

| अ.क्र. | पदाचे नाव | एकुण रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | * वय वर्ष | शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Entomologists | 7 | **BPHU**<br>Tuljapur -1<br>Omerga-1<br>Kalamb-1<br>Washi-1<br>Paranda-1<br>Lohara-1<br>Bhoom-1 | खुला-38<br>राखीव-43 | M.Sc. Zoology with 5 Years experience | 5 Years experience | SC-1<br>VJA-1<br>OBC-1<br>EWS-1<br>Open-3<br>**Total-7** | Rs.40000/- |
| 2 | Public Health Specialist | 9 | **BPHU**<br>Tuljapur -1<br>Omerga-1<br>Kalamb-1<br>Washi-1<br>Paranda-1<br>Lohara-1<br>Bhoom-1<br>**RNTCP**<br>Osmanabad-1<br>**NPCDCS**<br>Osmanabad-1 | खुला-38<br>राखीव-43 | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | - | SC-2<br>VJA-1<br>NTC-1<br>OBC-3<br>EWS-1<br>Open-1<br>**Total-9** | Rs.35000/- |
| 3 | Lab Technician | 14 | **BPHU**<br>Tuljapur -2<br>Omerga-2<br>Kalamb-2<br>Washi-2<br>Paranda-2<br>Lohara-2<br>Bhoom-2 | खुला-38<br>राखीव-43 | 12th+ Diploma | - | SC-1<br>ST-1<br>NTB-1<br>NTD-1<br>OBC-3<br>EWS-2<br>Open-5<br>**Total-14** | Rs.17000/- |

**अटी व शर्ती:-**

1. जाहीरातीमधील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसून सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
2. सदरील जाहीरात ही प्रकल्प अंमलबजावणी आरखडा मंजुरीनुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.
3. अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा पेक्षा जास्त नसावे. (खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागास प्रवर्गासाठी 43 वर्षे)
4. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांचेसाठी 5 वर्ष वय शिथील राहील. तथापि कागदपत्रे तपासणी दरम्यान सद्य स्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

5. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैदयकिय अधिकारी (MBBS), विशेषज्ञ, अतिविषेशज्ञ व अभियानातील इतर रुग्ण सेवेशी संबंधीत पदांसाठी (उदा.परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता इ.) सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील.

अ. वैदयकिय अधिकारी (MBBS), विशेषज्ञ, अतिविषेशज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्ष राहील.

आ. रुग्ण सेवेशी संबंधीत इतर पदाची वयोमर्यादा वयोमर्यादा 65 वर्ष राहील.

वय वर्ष 60 नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पुनर्नियुक्ती आदेश देण्यात येतील लागेल.

6. अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

7. अर्जात हेतुपुरस्कार खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवुन ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा खोटे, बनवट प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

8. सादर केलेली कागदपत्रे बनावट किंवा खोटी असल्याचे आढळुन आल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

9. अर्जामधील माहिती व कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये फरक आढळुन आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल.–अर्जामधील माहिती संदर्भात कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल.

10. गुणाऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीनुसार गुणाची (Grade) यादी सादर करावी.

11. एस.एस.सी किंवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज इंग्रजीमध्ये भरावा. नाव बदलेले असल्यास याबाबत आवश्यक कागदपत्र सोबत सादर करावीत.

12. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातुन अर्ज केला आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपुर्वक भरावी.

13. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवाराची पात्रता/अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा पुढील निवड प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात येईल. उमेदवाराचा अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदासाठी पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

14. Public Health Specialist या पदाची शैक्षणिक अर्हता Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health अशी असुन संदर शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराची वैद्कीय परिषद असुन त्यामध्ये नोंदणी करणे उमेदवारांना अनिवार्य आहे. त्यामुळे जाहिरातीत नमुद पदासाठी दिलेली शैक्षणिक अर्हता समतुल्य असले बाबतची एखाद्या उमेदवाराने मागणी केल्यास सदरील शैक्षणिक अर्हता समतुल्य आहे असे सिध्द करण्याची जबाबदारी सबंधीत उमेदवाराची राहिल. त्यासाठी उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक अर्हता ही ज्या विद्यापीठातुन संपादन करण्यात आली त्या विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंच्या मान्यतेने नमुद शैक्षणिक अर्हतेशी समतुल्या असल्याबाबतचे लेखी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर पदभरती बाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

15. Lab Technician या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराकडे महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

16. संबंधीत पदाशी निगडीत खाजगी /शासकिय अनुभवाचा विचार पदभरती/ निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

17. ज्या पदाकरीता अर्ज सादर केला आले त्या पदांशी संबंधीत असंलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल. या व्यतीरिक्त अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

18. ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अशा पदांकरीता अनुभव असलेले उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेस अनुभव बाबत आवश्यक निर्णय घेण्याचा अधिकार निवड समितीस राहील.
19. ज्या उमेदवारांनी यापुर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाज कल्याण/ आदिवासी विकास प्रकल्प व इतर कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.
20. जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल होऊ शकतो तसेच रिक्त पदांच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो यानुसार पदभरती स्थगीत करणे / रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार निवड समिती व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कसल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.
21. वरीष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शक सुचना नुसार पदभरती प्रक्रियेमध्ये आवश्यक तो बदल करण्यात येईल यामध्ये पद संख्या, शैक्षणिक अर्हता, वय, प्रवर्ग व इतर यामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील. याबाबत उमेदवाराचे कोणतेही म्हणने ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
22. राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
23. अर्जदारास एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट सादर करावा.
24. सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रीयेबाबची सर्व माहिती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परीषद उस्मानाबाद च्या नोटीस बोर्डावर, जिल्हा परीषद उस्मानाबाद च्या http://zposmanabad.gov.in यां संकेतस्थळावर, उस्मानाबाद जिल्ह्याच्या http://osmanabad.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार तसेच SMS, E-mail, दुरध्वनी संदेश केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
25. वरील पदांकरीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी अर्ज सादर करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम, पदस्थापनेचे ठिकाण व सेवानिवृत्त झालेले वर्ष, सेवा निवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी व संबंधीत कागदपत्र सोबत सादर करावीत.
26. निवड झालेल्या उमेदवारांना रु.100/- चे बॉन्ड पेपरवरती विहीत नमुन्यात करारनामा सादर करावा लागेल.
27. कागदपत्र तपासणी अथवा मुलाखतीस बोलविलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता अनुदेय राहणार नाही. उमेदवाराने स्वखर्चाने कागदपत्र तपासणी /मुलाखतीस उपस्थित राहावे.
28. IPHS अंतर्गत येणारी पदे ही ज्या ठिकाणी नियमीतची पदे रिक्त आहेत अशा ठिकाणी नियमीतचे कर्मचारी मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
29. **निवड प्रक्रिया:- उमेदवाराची खालील निकषानुसार गुणांकन यादी तयार करण्यात येईल.**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतीम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या गुणाच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे proportion काढावे. | 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम 20 गुण मिळालेल्या गुणाच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे proportion काढावे. | 20 गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक 1 वर्षासाठी 6 गुण (1 वर्षाकरीता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण ) | 30 गुण |
| | | एकुण 100 गुण |

30. उपरोक्त प्रमाणे गुणांकन यादी तयार करण्यात येईल. उपरोक्त निवड प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार निवड समितीस राहतील.

31. जाहिरातीमध्ये रिक्त दर्शविण्यात आलेले BPHU ठिकाणचे बांधकाम 70 टक्के पुर्ण झाले असल्यास प्राधान्याने सदर BPHU करीता पदभरती प्रक्रिया सुरु करण्यात यावी व BPHU तात्काळ कार्यान्वीत करण्यात यावे. तथापि 100 टक्के बांधकाम व संपुर्ण उपकरणाची खरेदी पुर्ण होईपर्यंत मनुष्यबळ भरती करण्यात येऊ नये अशा सुचना असल्यामुळे मनुष्यबळ भरती प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

32. **अर्ज सादर करण्याचे ठिकाण** : राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रुम नंबर 218, दुसरा मजला, जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे विहित नमुन्यातील अर्ज, डिमांड ड्राफ्ट, व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या व इतर कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज दिनांक 05/10/ 2023 पासुन दिनांक 13/10/ 2023 रोजी सायंकाळी 6:15 वाजेपर्यंत व्यक्तीश: अथवा पोस्टांने कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत.

33. टपालाद्वारे सादर केले जाणारे अर्ज हे फक्त अर्ज सादर करणेच्या शेवटच्या दिवसापर्यंतच स्विकारले जातील. त्यानंतर टपालाद्वारे प्राप्त होणारे अर्जाचा विचार केला जाणार नाही तसेच सदर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

34. **अर्ज शुल्क** : खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.150/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.100/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. डीडी च्या मागे स्वत:चे नाव व पदाचे नाव लिहावे. सदरचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) "DISTRICT HEALTH AND FW SOCIETY OSBD OTHER PROGRAM " या नावे देय असलेला असावा.

35. **अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रे** :- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व सर्व गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, चालु आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, शासकीय अनुभव प्रमाणपत्रे, एमएससी-आयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र, EWS-10% आरक्षणाचे वैध प्रमाणपत्र, वैद्कीय / निम वैद्कीय पदांकरीता संबंधीत वैद्कीय / निम वैद्कीय परिषदकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे सादर करावीत.

District Programme Manager
National Health Mission
Zilla Parishad Osmanabad

District RCH Officer
Zilla Parishad Osmanabad

Civil Surgeon
District Hospital, Osmanabad

District Health Officer
Zilla Parishad, Osmanabad

Chief Executive Officer
Zilla Parishad, Osmanabad

# National Health Mission, Osmanabad

## Application Form 2023-24

Stick here latest photograph Sign.Across

Application for the post of ------------------------------------------------

(All fields in the *mandatory to be filled Incomplete form submitted will be treated as rejected)

| | | |
|---|---|---|
| Exact Name of Post Applied for: | | |
| Full Name of Candidate: | | |
| Father's/Husband's Name: | | |
| Date of Birth (DD/MM/YYYY): | Blood Group: | Gender: |
| Marital Status: | Existing NHM Employee (Yes/No): | Nationality: |
| Religion:<br>Original Category: | Applying Category: | Caste Certificate Attached (Yes/No): |

**Demand Drafts Details:**

| Name of Bank: | DD Date: / /20 | DD Number: | DD Amount in Rs. |
|---|---|---|---|

**Address / Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| Address (Permanent): | Address (Present): |
|---|---|
| Taluka: | Taluka: |
| District: | District: |
| State : | State : |
| Pin code: | Pin code: |
| Mob.No. | Alternate Mob. No. |
| Email ID: | Alternate Email ID: |

Computer Proficiency:

**Academic / Professional Educational all Summary: (Starting form 10th class)**

| From (MM/YY) | To (MM/YY) | Degree / Diploma / Certificate | University / Board / Institute | Specialization / Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| Work / Experience Summary: (Starting from Current / Most Recent) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | From (DD/MM/YYYY) | To (DD/MM/YYYY) | Organization | Designation | Responsibilities (Min.30 and Max.50 Word's) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total Experience (in Years & Months): | | | | | |
| Details of Internship / Workshops / Trainings Attended (If any): | | | | | |

Declaration:

I hereby declare that all statements made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue / false / incorrect of I do not satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place: Signature

Date: / /20

Disclaimer:

The applicants are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said applicant shall be treated as non-responsive. National Health Mission shall not be responsible for late receipt or non-receipt of application/s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.

# प्रतिज्ञापत्र

## नमुना अ

मी श्री/श्रीमती/कुमारी ............................................................................................................

श्री.............................................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ..........

वर्ष, राहणार, ..................................................................................................... याद्‌वारे असे जाहिर करतो/करते की,

1) मी ........................................... या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला .........(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 23 जुलै 2020 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................ आहे (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

दिनांक 23 जुलै 2020 रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधीक असेल तर दिनांक 23 जुलै 2020 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**